3 या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी अ‍ॅण्ड नाष्टा सेंटर
संपूर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जाधभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४६८ वा • शुक्रवार, ता. १२ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## २००८ रेल्वे हल्ला प्रकरण; राज ठाकरे न्यायालयात हजर

### आरोप नाकारत सहकार्याची तयारी



**ठाणे । रयत समाचार**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे गुरुवारी ठाणे रेल्वे न्यायालयात २००८ मधील कल्याण स्टेशनवरील रेल्वे भरती हिंसाचार प्रकरणी सुनावणीसाठी हजर झाले. या प्रकरणात मनसे कार्यकर्त्यांवर उत्तर भारतीय उमेदवारांवर हल्ला करून भरती प्रक्रियेत गोंधळ घातल्याचा आरोप आहे. या घटनेनंतर ठाकरे व काही कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. सुनावणीदरम्यान न्यायाधीशांनी ठाकरे यांना आरोप मान्य आहेत का, अशी विचारणा केली. त्यावर त्यांनी ''मी दोषी नाही'' असे स्पष्ट सांगितले. न्यायालयाने सर्व आरोपींकडून पूर्ण सहकार्य अपेक्षित असल्याचे नमूद करत, केस एका महिन्यात निकालात काढता येऊ शकते, असे संकेत दिले. ठाकरे यांनी यात सहकार्य करण्याची तयारी दर्शवली.

सुनावणीनंतर ठाकरे यांचे वकील ओंकार राजुरकर यांनी सांगितले की, पुढील तारखेची घोषणा अद्याप झालेली नाही आणि आवश्यकतेशिवाय ठाकरे यांना पुन्हा प्रत्यक्ष हजर राहण्याची गरज भासणार नाही. न्यायालयाने 'अभियुक्त गुन्हा मान्य करतात का?' अशी औपचारिक विचारणा केली होती, ज्याला ठाकरे यांनी नकार दिल्याचे त्यांनी सांगितले. प्रकरणाची पार्श्वभूमी पाहता, २००८ मध्ये कल्याण स्टेशनवर झालेल्या भरती परीक्षेदरम्यान बाहेरील उमेदवारांवर झालेल्या हल्ल्यानंतर ही केस दाखल झाली. प्रारंभी कल्याण न्यायालयात सुरू असलेली सुनावणी पुढे ठाणे रेल्वे न्यायालयात वर्ग करण्यात आली. काही आरोपी वारंवार न्यायालयात गैरहजर राहिल्याने एकदा अटक वॉरंटही निघाले होते, जे नंतर रद्द करण्यात आले. न्यायालयाच्या संकेतामुळे आता ही केस अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत असल्याचे दिसत आहे.

## मतदारयादी पुनरिक्षणावर सर्वोच्च न्यायालय गंभीर; पुढील सुनावणी १६ डिसेंबरला

**नवी दिल्ली । रयत समाचार**

देशातील अनेक राज्यांमध्ये निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या विशेष तीव्र पुनरिक्षण प्रक्रियेवर आज सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाची सुनावणी पार पडली. वरिष्ठ विधिज्ञ राजू रामचंद्रन यांनी आपल्या युक्तिवादात म्हटले की, बिहारमध्ये पुनरिक्षणासाठी देण्यात आलेली कारणे तंतोतंत जशीच्या तशी इतर नऊ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये वापरली गेली आहेत, ज्यातून निवडणूक आयोगाने आवश्यक ती सखोल विचारप्रक्रिया न केल्याचे स्पष्ट होते. रामचंद्रन यांनी सांगितले की, ''निवडणूक आयोगाकडे मोठी रचना आणि अधिकारीवर्ग असूनही इतक्या व्यापक पुनरिक्षणासाठी स्वतंत्र कारणमीमांसा न करता समान कारणे देणे गैरजबाबदारपणाचे आहे.''

त्यांनी पुढे नमूद केले की, या पुनरिक्षणाचा उद्देश केवळ शहरीकरण, वाढते स्थलांतर आणि रहिवासी बदल यांमुळे मतदार यादी अद्ययावत करणे होता; परंतु प्रत्यक्षात मतदारांच्या नागरिकत्वाची छाननी करण्यावर भर दिला जात आहे. हे आयोगाच्या संवैधानिक कर्तृत्वाच्या विरोधात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्य न्यायाधीश सुर्या कांत यांनी विचारणा केली की, ''विशेष तीव्र पुनरिक्षण जवळपास वीस वर्षांनी केले जात आहे. अशा परिस्थितीत न्यायालय या प्रक्रियेत हस्तक्षेप करू शकते का?'' तसेच, मतदारांची नोंद पडताळण्यासाठी ओळखपत्रे किंवा इतर कागदपत्रांचा वापर का करू नये, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

न्यायमूर्ती बागची यांनी दुसऱ्या टप्प्यातील पुनरिक्षणासाठी कारणे 'कॉपी-पेस्ट' असल्याच्या आरोपावर शंका घेत, आयोगाने देशभरासाठी एकसंध पुनरिक्षणाची कल्पना मांडली असल्याचे नमूद केले. यावर रामचंद्रन म्हणाले की, ''मतदार याद्यांचे विशेष पुनरिक्षण म्हणजे पात्र मतदारांना सामावून घेण्याची प्रक्रिया आहे; त्यातून लोकांना वगळणे हा उद्देश कधीच नसतो.

## फिल्म क्रिटिक्स गिल्डने केला समीक्षकांवरील हल्ल्यांचा निषेध




**मुंबई । रयत समाचार**

चित्रपट समीक्षक आणि पत्रकारांवर गेल्या काही दिवसांत झालेले लक्ष्यित हल्ले आणि ऑनलाईन त्रासदायक वर्तनाचा फिल्म क्रिटिक्स गिल्डने निषेध केला आहे. या घटना चिंताजनक असून कोणत्याही व्यावसायिकाला आपले काम केल्याबद्दल वैयक्तिक बदनामी सहन करावी लागू नये, असे गिल्डने आपल्या निवेदनात म्हटले आहे.

गिल्डने स्पष्ट केले की, चित्रपट आवडणे किंवा न आवडणे हा प्रेक्षकांचा अधिकार असला तरी त्यासाठी समीक्षकांवर दबाव आणणे किंवा त्यांना धमकावणे चुकीचे आहे. अलीकडे उद्योगातील काही घटकांकडून फिल्म क्रिटिसिझमला कमी लेखण्याची प्रवृत्ती वाढत असून त्यामुळे स्वतंत्र समीक्षा व संपादकीय स्वायत्ततेला धोका निर्माण होत असल्याचे गिल्डने नमूद केले.

समीक्षकांवर राजकीय किंवा वैयक्तिक पक्षपातीपणाचे आरोप निराधार असल्याचे सांगत, समीक्षकांना त्यांच्या कामासाठी धमकावणे किंवा गप्प बसवण्याचा प्रयत्न लोकशाही मूल्यांवर आघात करणारा असल्याचे गिल्डने म्हटले आहे.

गिल्डने सर्वांनी संयम, आदर आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा मान राखावा, तसेच कला, चर्चा आणि टीका यांना सहअस्तित्व मिळावे, असे आवाहन केले.

## माध्यमे आणि वाचकांमधील दरी कमी करण्याचा इंडी जर्नलचा प्रयत्न

### फक्त ₹५०० मध्ये ५ सत्रांचा अनुभव

**पुणे । रयत समाचार**




माध्यम क्षेत्रात होणाऱ्या भव्यदिव्य कॉनक्लेव्हच्या तुलनेत सर्वसामान्यांसाठी खुला आणि परवडणारा असा उपक्रम इंडी जर्नल यंदाही करणार आहे. अनेक टीव्ही कॉनक्लेव्हचे पास ३०- ४० हजारांपर्यंत जात असताना, इंडी जर्नलचा डेलिगेट पास केवळ ₹५०० आणि विद्यार्थ्यांसाठी ₹३५० इतक्या सवलतीत उपलब्ध करून देण्यात आला. विशेष म्हणजे या शुल्कात पाचही सत्र, जेवण आणि चहा समाविष्ट आहेत.


इंडी जर्नलचा मीडिया कॉनक्लेव्ह हा फक्त कार्यक्रम नसून माध्यमे आणि वाचक, प्रेक्षक यांच्यातील दुरावा कमी करण्याचा लोकशाहीवादी उपक्रम असल्याचे कार्यकारी संपादक प्रथमेश पाटील यांनी सांगितले.

अधिक माहिती देताना पाटील म्हणाले, पंचतारांकित हॉटेलमधील कार्यक्रम माध्यमं आणि राजकीय वर्तुळातील भिंती उंचावत जातात. आमचे कॉनक्लेव्ह त्या भिंती तोडण्यासाठी आहे. एकदा येऊन तर बघा, सर्व प्रश्नांची उत्तरे स्वतः मिळतील.

या कार्यक्रमास पुणे कलेक्टिव्ह, एपीएसएस, विविध कामगार संघटना आणि सजग नागरिकांची साथ लाभत आहे. २० पेक्षा जास्त वक्ते आणि दिवसभरातील पाच संवादात्मक सत्रांमुळे हा उपक्रम खास होणार आहे.

## विराट, रोहितच्या कॉन्ट्रॅक्टमध्ये कपात? शुभमन गिलला अ+ ग्रेडची शक्यता

**मुंबई । रयत समाचार**



भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (बीसीसीआय) ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा२२ डिसेंबर २०२५ रोजी होणार असून, यावेळी टीम इंडियाच्या वरिष्ठ खेळाडू विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या सेंट्रल कॉन्ट्रॅक्ट ग्रेडवर पुन्हा विचार होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मागील वर्षभरात दोन्ही दिग्गजांनी टेस्ट आणि टी ट्वेंटी फॉर्मेंटमधून निवृत्ती घेऊन फक्त वनडे क्रिकेटवर लक्ष केंद्रीत केले आहे. सध्या हे दोन्ही खेळाडू अ+ वर्गात आहेत; मात्र सर्व फॉर्मेंटमध्ये सहभाग नसल्याने त्यांना अ+ ग्रेडाबाहेर करण्यात येऊ शकते, असे सूत्रांचे म्हणणे आहे. अ+ ग्रेडमधून बाहेर गेल्यास त्यांच्या वार्षिक पगारात सुमारे दोन कोटी रुपयांची कपात होऊ शकते. दुसरीकडे, टीम इंडियाचा नवीन टेस्ट आणि वनडे कर्णधार शुभमन गिल याला मोठा फायदा मिळण्याची शक्यता आहे. गिल सध्या अ ग्रेडमध्ये असला तरी मागील एका वर्षात त्याची कामगिरी आणि नेतृत्व लक्षात घेता, त्याला अ+ ग्रेडमध्ये पदोन्नती मिळू शकते, असे संकेत आहेत.

बैठकीत महिला क्रिकेट, देशांतर्गत क्रिकेटमधील करार, अंपायर आणि मॅच रेफरी यांच्या मानधन वाढीचे प्रस्ताव देखील चर्चेत राहणार आहेत.

यावेळी बीसीसीआय मधील अलीकडील प्रशासकीय बदलांनंतर होणारी ही पहिली महत्त्वाची बैठक असल्यामुळे सर्वच क्षेत्रांत काही निर्णायक निर्णय होण्याची शक्यता आहे.

## तर शहाजी महाराजांच्या समाधीचा शोधही लागला नसता- आमदार मुळे



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

छत्रपती शिवरायांना स्वराज्य स्थापनेचे ध्येय देणारे शहाजी महाराज दक्षिणेत अनेक वर्ष कार्यरत होते. बेंगळुरू शहर विकासाचा पाया त्यांनी रचला. जंगली श्वापदांच्या त्रासामुळे गोदेगेरी येथे शिकारीला गेलेल्या शहाजी महाराजांचा घोड्यावरून पडून मृत्यू झाला. गोदेगेरी येथील त्यांच्या समाधीचा शोध तात्कालीन केंद्रीय कृषिमंत्री पंजाबराव देशमुख यांनी लावला. त्यांनी समाधी स्थळ सुरक्षित करून २० गुंठे जागा पुरातत्त्व विभागाकडे हस्तांतरित केली.

हिवाळी अधिवेशनानिमित्त बेळगावात पत्रकारांशी बोलताना मुळे म्हणाले, ''शहाजी महाराजांचा दक्षिणेतील इतिहास व्यापक आहे. छत्रपती शिवरायांचे बालपण बेंगळुरू येथे गेले. याच ठिकाणी शिवरायांना स्वराज्य स्थापनेचा कानमंत्र देण्यात आला. शिवराय महाराष्ट्रात परतले, मात्र त्यांचे थोरले बंधू संभाजीराजे दक्षिणेतच राहिले.'' ते पुढे म्हणाले, ''गोदेगेरी परिसरात वाढलेल्या जंगली प्राण्यांच्या त्रासामुळे शहाजीराजे तेथे गेले आणि तेथेच त्यांचा

> **श**हाजी महाराजांच्या समाधी स्थळाची दुरवस्था आणि महाराष्ट्राकडून झालेली उपेक्षा याबाबत कर्नाटक विधान परिषदेचे सदस्य आणि कर्नाटक मराठा महासंघाचे नेते आमदार मारुतीराव मुळे यांनी तीव्र खंत व्यक्त केली.

मृत्यू झाला. पंजाबराव देशमुख यांच्या पुढाकारामुळे समाधी बांधली गेली. संभाजीराजे यांची समाधी कोप्पळ येथे आहे. परंतु या दोन्ही स्मृतीस्थळांची माहिती महाराष्ट्रातील समाज व नेते यांना पुरेशी नाही. शिवरायांचा शेवटचा लष्करी तळ श्रीमंतगड (जि. गदग) होता. शहाजीराजे यांचा खरा इतिहास जाणून घेण्याची जाणीव समाजात दिसत नाही; केवळ जयघोष करण्यात समाधान मानले जाते, ही मराठा समाजाची शोकांतिका आहे.''

शहाजी महाराजांच्या स्मृतीस्थळाची उपेक्षा होत असल्याचे सांगताना मुळे म्हणाले, ''या स्मृतीस्थळाचा कायापालट व्हावा, शिवस्वराज्य गौरव स्थळ उभे राहावे, यासाठी मी वीस वर्षांपासून प्रयत्न करतो आहे. विकास आराखडा तयार करून कर्नाटक सरकारला दिला. त्यांनी निधी उपलब्ध केला. बेळगावचे पालकमंत्री सतीश जारकीहोळी यांनीही मदत दिली.'' शहाजी महाराजांच्या स्मृतीस्थळासाठी अनेक राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय नेत्यांची भेट घेऊन त्यांना माहिती दिल्याचेही मुळे यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, नितीन गडकरी, जे. पी. नड्डा, राजनाथ सिंह, प्रल्हाद जोशी, तसेच महाराष्ट्रातील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विविध राजघराण्यांच्या प्रतिनिधींना भेटून स्मृतीस्थळाच्या विकासासाठी विनंती करण्यात आली.

मुळे म्हणाले, ''सर्वांनी सकारात्मक प्रतिसाद दिला; आश्वासनेही दिली, पण प्रत्यक्षात काहीच घडत नाही. शहाजी महाराजांच्या स्मृतीस्थळाच्या विकासासाठी कोणीही गंभीर नाही, हे मराठा समाजाचे दुर्दैव आहे.''

## केवळ पाच दिवसांत ब्लॉकबस्टर! मामूटींच्या 'कलामकावल'समोर इतर सिनेमांची चमक फिकी

**मुंबई । रयत समाचार**




मल्याळम चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते मामूटी पुन्हा एकदा आपल्या उत्तुंग अभिनयामुळे चर्चेत आले आहेत. त्यांचा नवा क्राइम-मिस्ट्री थ्रिलर 'कलामकावल' प्रदर्शित होताच बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करत आहे. केवळ ५ दिवसांत चित्रपटाने जगभरात तब्बल ५० कोटी रुपयांचा टप्पा पार केला, तर भारतातलं नेट कलेक्शन २२.२० कोटींवर पोहोचलं आहे. ५ डिसेंबरला प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने पहिल्याच आठवड्यात आपल्या बजेटच्या दुप्पट कमाई करत ब्लॉकबस्टरचा मान पटकावला आहे. अंदाजे २५ कोटींच्या खर्चात तयार झालेल्या 'कलामकावल'ला प्रेक्षक आणि समीक्षकांकडूनही प्रचंड सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. कथानकाची गुंतागुंत, दमदार सादरीकरण आणि मामूटींचा प्रभावी अभिनय या यशाचं प्रमुख कारण मानलं जात आहे. केवळ केरळच नाही, तर मुंबई, दिल्ली-एनसीआर, बंगळुरू, चेन्नई यांसारख्या प्रमुख शहरांमध्येही या सिनेमाचे शो हाऊसफुल्ल चालू आहेत. कोची, कोल्लम, अलाप्पुझा आणि कोट्टायम येथे सरासरी ४० ते ६० टक्के ऑक्युपन्सी नोंदवली गेली. सायंकाळी आणि रात्रीचे शो जवळजवळ पूर्ण क्षमतेने चालत आहेत.

७४ वर्षांच्या मामूटींचा हा उत्स्फूर्त फॉर्म पाहता, 'कलामकावल' पुढील आठवड्यात आणखी मोठी कमाई करील, अशी चित्रपट तज्ज्ञांची अपेक्षा आहे. साऊथ सिनेमा प्रेमींसाठी हा चित्रपट वर्षातील मोठी भेट ठरली.

## भारतीय शेतीक्षेत्र आणि वित्त भांडवल

**अर्थवार्ता । संजीव चांदोरकर**

काही दिवसापूर्वी ग्रामीण भागातील एक तरुण मित्राने मेसेंजर मध्ये विचारले ''सर तुम्ही हे युग वित्त भांडवलाचे युग आहे म्हणता, पण ते तर तुमच्या मुंबईसारख्या शहरात अवतरले असेल. ग्रामीण भागातील शेती क्षेत्राशी त्याचा काय संबंध आहे''. त्या निमित्ताने

हे खरे आहे की अमेरिकेच्या तुलनेत, भारतासारख्या देशात अर्थव्यवस्थेच्या वित्तीयकरणाची सुरुवात अलीकडची आहे; दुसरे हे देखील खरे आहे की महानगरांच्या तुलनेत भारतातील शेती, ग्रामीण भागात ते कमी पोचले आहे. पण हे काही स्थिर चित्र नाही. वेगाने बदलत आहे. येत्या काळात अधिकाधिक शेतीक्षेत्राला, ग्रामीण भागाला ते वेढणार आहे हे नक्की.

आजच्या घडीला भारतीय शेतकऱ्यांना वित्त भांडवल किमान तीन बाजूने भिडत आहेत; त्यात अजून भर घालता येईल. (१) मुबलक कर्ज पुरवठा, (२) शेतीमालाच्या भावांवर कमोडिटी एक्सचेंजमधील व्यवहारांचा निर्णायक प्रभाव आणि (३) पीक विमा

**(१) कर्ज पुरवठा**

शेती व ग्रामीण भागात मुख्यप्रवाहातील बँका पोचल्या नव्हत्या. शेतकऱ्याला प्राथमिक सहकारी पतपेढीतून, सार्वजनिक बँकांकडून पीक कर्ज मिळायचे तेव्हढेच. गेल्या पाचदहा वर्षात सार्वजनिक, खाजगी बँका, स्मॉल फायनान्स बँका, बंधन, मायक्रो फायनान्स एनबीएफसी यांचे जाळे ग्रामीण भागात पसरले आहे. शेतीसाठीच नाही तर ''विना कारण, विना तारण'' कर्जे मुबलक उपलब्ध केली जात आहेत. याचे आकडे दरवर्षी वाढत आहेत. ''यातून शेती आणि जमिनींशी निगडीत उपजिविका करणाऱ्यांकडून, शेतकऱ्यांकडून मोठयाप्रमाणावर सरप्लस वित्त भांडवलकडे वर्ग होत आहे.

**(२) कमोडिटी एक्सचेंज**

कमोडिटी एक्सचेंज वर काही शेतमालाच्या बोली लावल्या जातात. त्या यादीत भविष्यात भर पडू शकते. भारतातील कमोडिटी एक्सचेंजवर होणारे लाखो कोटींचे व्यवहार दर वर्षागणिक वाढत आहेत. या व्हर्च्युअल मार्केटमधील व्यवहारांचा परिणाम खऱ्या खुऱ्या शेतीमालाच्या खरेदीविक्री वर होत असतो. एव्हढेच नव्हे तर कमोडिटी एक्सचेंज मुळे आंतरराष्ट्रीय बाजारात, व दुसऱ्या देशात एखाद्या शेतीमालाच्या भावात मोठे पडझड झाली तर त्याचे परिणाम भारतातील मंड्यातील भावात लगेचच पडतो. उदा अर्जेंटिना मध्ये सोयाबीनचे भरमसाट पीक आले कि भारतात सोयाबीनचे भाव गडगडतात.

**(३) पीक विमा**

केंद्र आणि राज्य सरकार स्वतः नुकसानभरपाई न देता विविध पीक विमा कंपन्यांमार्फत ती देऊ लागली आहे. आता विम्याच्या प्रीमियमचा हप्त्याचा मोठा भाग शासन भरत असेल. पण मुद्दा पीक विम्याचा हप्ता कोण भरते हा नसून नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना वाजवी नुकसानभरपाई वेळेवर मिळते की नाही हा आहे. इथे वाजवी आणि वेळेवर हे दोन्ही शब्द महत्वाचे आहेत. आणि दोन्ही बाबतीत शेतकरी हवालदिल आहेत. विमा कंपन्यांची क्लिष्ट प्रणालीच अशी बनवली जाते की दावा करणारे किमान काही शेतकरी फिल्टर आउट होतील. कारण विमा कंपन्यांचा नफा ''क्लेम्स रेशयो''वर निर्धारित असतो.



संजीव चांदोरकर
अर्थवार्ता

भारतीय शेतीक्षेत्रात भविष्यात गोष्टी मोठयाप्रमाणावर बदलू शकतात.

भारतीय शेतीक्षेत्रात कॉर्पोरेट क्षेत्र प्रवेश करण्याची प्रक्रिया वेग पकडू शकते. शेतकऱ्यांनी संघटितपणे तीन शेती बिलांना काही वर्षांपूर्वी विरोध केला होता. काळ वेळ पाहून तशा प्रकारचे कायदे पुन्हा , कदाचित वेगळे कपडे परिधान करून येऊ शकतात.

दुसरे म्हणजे शेती किफायतशीर न राहिल्यामुळे , जमिनी विकण्याची आधीच सुरु झालेली प्रक्रिया वेग पकडू शकते. छोट्या जमिनी विकत घेणाऱ्या ऍग्रीगेटर कॉर्पोरेट कंपन्या, ज्यात जागतिक भांडवल येत आहे, तयार झाल्या आहेत. त्या नंतर त्या जमिनी विविध हेतूंसाठी विकल्या जाऊ शकतात.

हे सर्व पुढच्या दोन चार, पाच वर्षात सारा देश व्यापेल असे नाही. पण दिशा हीच असेल. ती बदलणारी नाही. बदलाचा वेग अनेक गोष्टींवर अवलंबून असेल.

# मनपाच्या जन्मनोंदणी विभागातील नोंदवहीची चाळण, नागरिक त्रस्त; आरोग्य अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का- शाकिर शेख

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या जन्मनोंदणी विभागातील अभिलेखांची अत्यंत दयनीय अवस्था उघडकीस आली आहे. जन्मनोंद असलेली अनेक वर्षांची मूळ नोंदवही पूर्णतः चाळण झालेली असून तिचे वाचन, पडताळणी किंवा संगणकीय नोंदणी करणे अशक्य बनले आहे. सदर अभिलेखांची दुय्यम प्रत बाळासाहेब देशपांडे रुग्णालयातून उपलब्ध करून घेऊन संगणक प्रणालीत नोंद करणे हे आरोग्य अधिकारी यांचे कायदेशीर कर्तव्य असतानाही त्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली नाही, अशी गंभीर माहिती समोर आली आहे.

यामुळे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज करणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून, आरोग्य अधिकाऱ्यांकडून "सदरची नोंद उपलब्ध नाही, तहसीलदारांचा आदेश आणावा" असे तोंडी उत्तर देण्यात येत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. जन्मनोंदणी विभागाची चूक असताना त्याची शिक्षा नागरिकांना मिळत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

सामाजिक कार्यकर्ते शाकिर शेख यांनी याबाबत आवाज उठवत विचारले आहे की, "जन्मनोंदणी विभागातील निष्काळजीपणामुळे नागरिकांना न्याय नाकारला जात आहे. सदर त्रुटीबाबत महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे आरोग्य अधिकाऱ्यावर कारवाई करणार का?"

नागरिकांच्या मूलभूत नागरी हक्कांशी संबंधित असल्याने हे प्रकरण गंभीर मानले जात असून, सदर विभागातील अभिलेखांचे डिजिटलायझेशन, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई आणि प्रक्रियेत तातडीचे सुधारणा याची मागणी होत आहे.



# प्रभु पार्श्वनाथ भगवान जन्म कल्याणक महोत्सवाचे आयोजन

**अहमदनगर । पंकज गुंदेचा**

जैन धर्मात प्रभु परमात्माच्या रूपाने २४ तीर्थंकर भगवानांना वंदनीय आणि पूजनीय मानले जाते. २३ वे तीर्थंकर श्री पार्श्वनाथ भगवान यांची स्तोत्रे, भजने अत्यंत लोकप्रिय असून संकट निवारक म्हणून सर्वश्रुत आहेत. त्यांच्या केवळ नामस्मरणानेही श्रध्दाळू भक्तांच्या कष्ट, पीडा व बाधा दूर होतात, म्हणूनच पार्श्वनाथ भगवान पुरुषादानीय म्हणून ओळखले जातात.



श्री चिंतामणि प्रभु पार्श्वनाथाय नमः

रविवार, १४ डिसेंबर रोजी प्रभु पार्श्वनाथ भगवानांचा जन्म कल्याणक महोत्सव आनंदधाम, येथे संपन्न होत आहे. या निमित्ताने राष्ट्रसंत आचार्य सम्राट प.पू. श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या शिष्यरत्न महाराष्ट्र प्रवर्तक प.पू. श्री कुंदनऋषिजी म.सा., प्रबुद्ध विचारक प.पू. श्री आदर्शऋषिजी म.सा., संस्कार दिवाकर प.पू. श्री आलोकऋषिजी म.सा. यांसह साधु, साध्वीजी महाराजांच्या पावन सान्निध्यात पाच दिवसीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१२ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या या महोत्सवात दररोज सकाळी ९ ते १० या वेळेत जाप आराधना व साधु, साध्वीजींची प्रवचने होणार आहेत. १२ तारखेला पांढरे, १३ ला नेव्ही ब्लू, १४ ला हिरवे, तर १५ ला स्काय ब्लू वस्त्र परिधान करण्याचे आवाहन आयोजकांनी केले.

१६ डिसेंबर रोजी आनंद, उज्वल, प्रमोद ग्रुपच्या विदुषी साध्वी श्री विरागदर्शनाजी म.सा. यांना पाचव्या स्मृतिदिनानिमित्त जाप गुणानुवाद सभेद्वारे श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे.

विशेषतः प्रभु पार्श्वनाथ भगवान जन

कल्याणक महोत्सवानिमित्त १४ डिसेंबर, रविवार रोजी विशिष्ट जाप साधना, एकासन, आयंबिल, उपवास, तेला तप किंवा आबालवृद्धांनी एकासन तप करण्याचे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ व श्री जैन तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड, अहिल्यानगर यांनी केले आहे. एकासन आराधकांसाठी भोजनाची व्यवस्था भक्तनिवास येथे करण्यात आली आहे.

तरी श्रध्दाळू श्रावकश्राविकांनी या पाच दिवसीय कार्यक्रमाचा सपरिवार लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव

# नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी महानगरपालिका कधी घेणार- शिरसुल

**अहमदनगर । रयत समाचार**

शहरात बिबट्याच्या हल्ल्यांबरोबरच भटक्या व मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रवही चिंताजनक बनला आहे. पहाटे फिरायला जाणारे नागरिक, लहान मुले, महिला, वयोवृद्ध तसेच वाहनचालक यांना कुत्र्यांचे टोळके पाठलाग करून हल्ला करत असल्याने अनेकजण गंभीर जखमी होत आहेत. शहरातील सुरक्षिततेची स्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असून "बिबट्यापासून लोकांचे संरक्षण शासन करत आहे, मग भटक्या कुत्र्यांपासून संरक्षणाची जबाबदारी महानगरपालिका कधी घेणार?" असा थेट सवाल स्वाती शिरसुल यांनी मनपाला उपस्थित केला.



गेल्या काही महिन्यांत दिल्लीगेट, झेंडीगेट, बुरुडगाव, केडगाव, सावेडी, बोल्हेगाव आदी भागांत भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. रस्ते, सार्वजनिक जागा व निवासी भागात मुक्तपणे फिरणाऱ्या कुत्र्यांमुळे नागरिक भयभीत झाले आहेत. या समस्येबाबत तातडीची उपाययोजना आवश्यक असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

शिरसुल म्हणाल्या, "अलीकडे पुण्याचे आमदार महेश लांडगे यांनी विधानसभेत हा विषय गांभीर्याने मांडला. त्यामुळे या समस्येची गंभीरता राज्यपातळीवर अधोरेखित झाली. मात्र महानगरपालिका अद्याप निष्क्रिय आहे."

"जाळी उभारून इमारत दाखवण्यात आली, पण त्यानंतर कोणतीही देखभाल होत नाही. जनतेची दिशाभूल व निधीची उधळपट्टी झाली आहे," असा आरोप त्यांनी केला.

काही श्वानप्रेमी संघटना भटक्या कुत्र्यांचे संरक्षण व आहार देतात, परंतु हेच कुत्रे नागरिकांवर हल्ले करून जखमी करतात, रेबीजचा धोका निर्माण करतात. "नागरिकांचा जीव महत्वाचा की कुत्र्यांच्या मुक्त संचाराला पाठबळ देणारे नियम? अशी जबाबदारी कोण घेणार?" असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

"बिबट्या असो किंवा भटके कुत्रे नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करणे हे शासन व महानगरपालिकेचे मूलभूत कर्तव्य आहे. या जीवघेण्या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन प्रभावी उपाययोजना कराव्यात," अशी ठाम मागणी स्वाती शिरसुल यांनी प्रशासनाला केली. ठेवण्यात आले आहेत? श्वानगृहात कर्मचाऱ्यांची नेमणूक आहे का?

# रांगोळीच्या नकाशातून मांडला वंजारवाडीचा विकास आराखडा



**नेवासा । विजय खंडागळे**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न मुळा एज्युकेशन सोसायटीचे कृषी महाविद्यालय, सोनई येथील कृषिकन्यांनी 'ग्रामीण जागरूकता कृषि कार्यानुभव व औद्योगिक जोड प्रकल्प २०२५-२६' हा कार्यक्रम राबविला. या अंतर्गत कृषिकन्यांनी वंजारवाडी (ता. नेवासा) गावाचा प्रत्यक्ष आढावा घेत हनुमान मंदिर प्रांगणात रांगोळीच्या माध्यमातून गावाची प्रतिकृती नकाशाच्या स्वरूपात सादर केली.या उपक्रमासाठी करण्यात आलेल्या क्षेत्रीय पाहणीत पिकांची स्थिती, जलस्रोत, समस्या व संधी यांसारख्या मुद्द्यांचे निरीक्षण करून गावाची सखोल माहिती गोळा करण्यात आली. चालताना निरीक्षण, प्रश्न विचारणे व स्थानिकांचे अनुभव ऐकणे या माध्यमातून कृषिकन्यांनी गावाची भौगोलिक, सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी समजून घेतली.

सहभागी ग्रामीण मूल्यांकन ही स्थानिकांना त्यांच्या गरजा, समस्या व क्षमतांची जाणीव करून देत विकास प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याची प्रभावी पद्धत आहे. या तंत्राच्या माध्यमातून विकास कार्यकर्ते व संस्था स्थानिकांच्या ज्ञानातून शिकून अधिक व्यवहार्य उपाययोजना आखतात.

या सादरीकरणात गावाचा वार्षिक पीक तक्ता, उत्पादन तक्ता, मातीचा तक्ता, सामाजिक नकाशा, रस्त्यांचा नकाशा, रहदारी नकाशा, जलकुंभ व सरकारी कार्यालयांचे नकाशे यांचा समावेश करण्यात आला होता.

कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब दराडे यांनी उपस्थित राहून आपले मनोगत व्यक्त केले. त्यांच्यासह रामकिसन दराडे, प्रशांत दराडे, अनिल दराडे, सोमेश्वर दराडे, आकाश दराडे, रविंद्र दराडे, आशालता दराडे, अनिता शिरसाठ, छगाबाई दराडे व अन्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनील बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. अतुल दरंदले, कार्यक्रम अधिकारी डॉ. निर्मला विधाते व विषयविशेषज्ञ डॉ. संतोष चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिकन्या संचिता संदीप शेटे, फ्लाविया अरुण संसारे, ऋतुजा कारभारी लोणारी, रोहिणी रमेश वळवी, मृणाल संजय पवार व श्रद्धा अशोक साळुंके यांनी हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

# श्रीरामपूरच्या मातीत घडलाय 'देवदूत'

## गणेश बिरदवडेंचा अनोखा शैक्षणिक 'कलाविष्कार'



**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

तालुक्याची भूमी ही संतांची आणि कलाकारांची भूमी म्हणून ओळखली जाते. याच भूमीतून सध्या एक संवेदनशील शैक्षणिक लघुपट सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. 'देवदूत' या नावाने सादर झालेला हा लघुपट ग्रामीण पार्श्वभूमी, स्थानिक कलाकारांचा अभिनय आणि सामाजिक संदेश यांच्या प्रभावी संमिश्रणामुळे प्रेक्षकांच्या मनात घर करत आहे.

लघुपटाचे लेखन, दिग्दर्शन आणि निर्मिती या तिन्ही जबाबदाऱ्या गणेश बाजीराव बिरदवडे यांनी समर्थपणे सांभाळल्या आहेत. ग्रामीण भागातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने त्यांनी या लघुपटाचा घाट घातला.

कुठल्याही भव्य स्टुडिओचा आधार न घेता, श्रीरामपूर व शिरसगावच्या नैसर्गिक परिसरात या लघुपटाचे चित्रीकरण पार पडले. या लोकेशन्समुळे लघुपटाच्या कथेला वास्तवाचा गडद स्पर्श मिळाला. छायाचित्रकार रवी जावरे यांनी लघुपटाच्या दृश्यांना आपल्या कॅमेऱ्यात प्रभावीपणे टिपले.या लघुपटातील कलाकार संगीता वाघमारे, अस्मिता मोरे, गोरख गायकवाड व दीपक गोर्डे हे सर्वच स्थानिक असून त्यांच्या सशक्त अभिनयामुळे कथानक अधिक प्रभावी बनले आहे. सहजसुंदर अभिनयाच्या माध्यमातून त्यांनी लघुपटातील भावना थेट प्रेक्षकांच्या मनापर्यंत पोहोचवल्या आहेत.

'देवदूत' या लघुपटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शिक्षण, सामाजिक भान आणि लोककलेचा संगम घडवण्यात आल्याने ही कलाकृती राज्यातील शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात एक महत्त्वाची भर ठरते आहे. गणेश बिरदवडे व त्यांच्या टीमचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

**लघुपट : देवदूत**
**लेखन, दिग्दर्शन, निर्मिती : गणेश बाजीराव बिरदवडे**
**छायाचित्रण : रवी जावरे**
**कलाकार : संगीता वाघमारे, अस्मिता मोरे, गोरख गायकवाड, दीपक गोर्डे**
**चित्रीकरण स्थळ : शिरसगाव, श्रीरामपूर**

# मंगल भक्त सेवा मंडळाचा दत्त जयंती सोहळा उत्साहात

**नगर तालुका । रयत समाचार**

सदगुरू श्री शंकर दत्त महाराज यांच्या कृपाशिर्वादाने आणि गुरूवर्य श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (राजाभाऊ कोठारी) यांच्या मार्गदर्शनातून ता. २८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर या कालावधीत शिव महापुराण कथा सप्ताह आणि सदगुरू श्री दत्त महाराज जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन श्री शंकर महाराज मठ, मंगल दत्त क्षेत्र, एफ-७०, एमआयडीसी येथे करण्यात आले. भागवताचार्य हभप नवनाथ महाराज म्हस्के यांच्या सुमधुर वाणीतून भाविकांनी सप्ताहातील कथामृताचा लाभ घेतला.

श्री दत्त महाराज जन्मोत्सव सोहळ्याच्या दिवशी सकाळपासूनच सनईचौघड्याच्या मंगल नादात श्रींचा महाभिषेक, पालखी, पाळणा, महाआरती, दर्शन सोहळा व महाप्रसाद असा भक्तिमय कार्यक्रम पार पडला. मंडळाच्या भजनमंडळींनी सादर केलेल्या भक्तिगीतांनी वातावरण अधिकच पवित्र झाले. विशेष म्हणजे, श्री श्री १००८ योगी पीर रामनाथजी महाराज, मठाधीश, अखिल भारतीय नाथ संप्रदाय, भर्तहरी गुफा, उज्जैन (म.प्र.) यांच्या अनमोल उपस्थितीमुळे कार्यक्रमाला मंगलमय चैतन्य प्राप्त झाले.

सायंकाळी सप्ताहाच्या अनुषंगाने काल्याचे कीर्तन हभप नवनाथ महाराज म्हस्के यांचे चिरंजीव साई महाराज म्हस्के यांनी सुमधुर वाणीतून सादर केले. सप्ताह व सोहळा यशस्वीरित्या पार पाडण्यात सहकार्य करणारे श्री श्री १००८ योगी पीर रामनाथजी महाराज, नवनाथ महाराज म्हस्के तसेच कथेला साथ देणाऱ्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

या संपूर्ण सोहळ्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहभाग घेणाऱ्या सर्व भाविक भक्तगणांचे मंगल भक्त सेवा मंडळ ट्रस्टतर्फे आभार व्यक्त करण्यात आले.

**आपला वाढदिवस**
रक्तदानाने साजरा करा

**दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक**
**गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे**
**ख्रिसमस विशेषांक**
अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात
अतिथी संपादक
सॅम्युअल वाघमारे
8788412780
संपादक
भैरवनाथ वाकळे
8805401800
रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक
जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक
भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

**रयत समाचार Classified छोटी जाहिरात**
छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद
खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?



✲ अधिक माहितीसाठी संपर्क ✲
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
✲ पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# वाढदिवस दक्षिणेतील देवाचा

दक्षिणेतील देव अशी ओळख असलेले सुपरस्टार रजनीकांत यांचा आज ७५वा वाढदिवस. सुपरस्टार रजनीकांत यांच्या शिरपेचात चार वर्षांपूर्वी एक मानाचा तुरा रोवला गेला होता. रजनीकांत यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च अशा मानाच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने चार वर्षापूर्वी गौरविण्यात आले होते.

६७ व्या राष्ट्रीय फिल्म पुरस्कार सोहळ्यात तत्कालीन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू आणि केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते त्यांना या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. रजनीकांत यांना यापूर्वी पद्मभूषण (२०००) व विद्मविभूषण (२०१६) या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. जिवंतपणीच आख्यायिका बनलेले रजनीकांत हे एक अवलिया व्यक्तिमत्त्व.

रजनीकांत यांच्या नावावर अनेक विनोद, टोमणे, उपदेश, म्हणी, मिम्स प्रचलित आहेत. त्यांचे देश विदेशात हजारो फॅन क्लब्ज आहेत. रजनीकांत यांना उद्देशून एखादा अपशब्द जरी काढला तरी तामिळनाडूत दंगली उसळतात. त्यांच्या इतकी लोकप्रियता कोणत्याच अभिनेत्याला मिळालेली नाही. त्यांचा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच सुपरहिट झालेला असतो. चित्रपटाचे तिकीट काढण्यासाठी प्रेक्षक पहाटेपासूनच रांगा लावतात. त्यांच्या फोटोवर दुग्धाभिषेख करतात. तामिळनाडूत तर त्यांची मंदिरे आहेत. देवाप्रमाणे लोक त्यांची पूजा करतात.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

१२ डिसेंबर १९५० रोजी बंगळुरू येथे एका महाराष्ट्रीयन कुटुंबात रजनीकांत यांचा जन्म झाला. त्यांचे खरे नाव शिवाजीराव गायकवाड असून त्यांच्या वडिलांचे नाव रामोजीराव गायकवाड असून आईचे नाव जिजाबाई आहे. पुरंदर तालुक्यातील मावडी- कडेपठार हे त्यांचे मूळ गाव. ८० - ९० वर्षांपूर्वी त्यांचे कुटुंब बंगळुरात स्थलांतरित झाले व तिथेच स्थायिक झाले. त्यांचे वडील कर्नाटक पोलिसात शिपाई होते.

त्यांना लहानपणापासून अभिनयाचे वेड होते. अभिनयाचे वेड जपत त्यांनी अनेक लहानसहान कामे केली. बारावी पास झाल्यावर काही काळ त्यांनी बस कंडक्टर म्हणूनही काम केले. नशिब आजमावण्यासाठी त्यांनी मद्रास फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला आणि सिनेजगताला एक सुपरस्टार मिळाला. अपूर्ण रागंगल या तामिळ चित्रपटातुन त्यांनी आपल्या फिल्मी करियरची सुरवात केली. आजवर त्यांनी १५० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. अंधा कानून या चित्रपटातून त्यांनी बॉलिवूड मध्ये पदार्पण केले. केवळ तामिळ आणि हिंदीच नव्हे तर कन्नड, तेलगू, तामिळ, बंगाली, इंग्रजी चित्रपटातून भूमिका केल्या.

त्यांच्या अभिनय कारकिर्दीला नुकतेच पाच दशके पूर्ण झालीत. तब्बल पाच दशके आपल्या अभिनयाने चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे रजनीकांत हे आपल्या अभिनयाबरोबरच आपल्या डॅशिंग स्टाईल आणि स्टंट साठीही ओळखले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजण त्यांचे चाहते आहेत. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट, प्रेक्षकांची गर्दी खेचून आणणारे, आपल्या संवाद फेकी बद्दल प्रसिद्ध आणि विशिष्ट स्टाईल बद्दल प्रसिद्ध आणि आपल्या विशिष्ट अभिनय शैली साठी रजनीकांत ओळखले जातात.

दक्षिण भारतात त्यांच्या नावे सर्वात जास्त यशस्वी चित्रपट आहेत. त्यांचा चाहतावर्ग देशातच नाही तर विदेशातही आहे. जपानमध्ये त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. तिथे त्यांचे चित्रपट अधिक लोकप्रिय आहेत. तिथेही त्यांचे फॅन क्लब्ज आहेत. सर्वाधिक चाहतावर्ग असलेला अभिनेता म्हणून त्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये त्यांची नोंद झाली आहे. त्यांना चार वेळा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कारही मिळाला आहे.

रजनीकांत जितके अभिनेते म्हणून श्रेष्ठ आहेत तितकेच ते माणूस म्हणूनही श्रेष्ठ आहेत. ते त्यांना मिळणाऱ्या मानधनाच्या एकूण ४० टक्के एव्हढी रक्कम समाजसेवेसाठी वापरतात. रजनीकांत हे असे एकमेव अभिनेते आहेत की जे एकाही उत्पादनाची जाहिरात करत नाहीत. उद्देश एकच की लोकांमध्ये कोणताही चुकीचा संदेश जाऊ नये. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या या सुपरस्टारला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!


# आनंद पटवर्धन यांना डॉ. असगर अली इंजिनिअर स्मृती जीवनगौरव पुरस्कार जाहीर

## वारशाला सलाम; आजच्या भारतावर थेट भाष्य

**उदयपूर । रयत समाचार**

प्रसिद्ध माहितीपट निर्माते आनंद पटवर्धन यांना यंदाचा डॉ. असगर अली इंजिनिअर स्मृती जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला असून या सन्मानाबद्दल त्यांनी व्यक्त केलेले मनोगत विशेष चर्चेत आहे.

पटवर्धन म्हणाले, ही निवड माझ्यासाठी मोठा सन्मान आहे; पण असगर अली इंजिनिअर यांच्या स्मृतीमुळेच मी हा पुरस्कार स्वीकारण्याचा निर्णय घेतला.त्यांनी असगर अलींचे स्मरण करताना सांगितले, ते फक्त साम्प्रदायिक सलोखा प्रस्थापित करणारे महान नेते नव्हते, तर आपल्या कार्यकर्त्यांसाठी ते शहाणे, सोपे आणि खरे मार्गदर्शक होते. हिंदू आणि मुस्लीम अतिरेक्यांकडून एकाचवेळी हल्ले सहन करावे लागणे, हेच त्यांच्या कामाचे मोठे मूल्य असल्याचे त्यांनी नमूद केले.



पुढे बोलताना, पाटवर्धन यांनी आजच्या भारतातील स्थितीवर परखड टिपणी केली. ते म्हणाले, १९९२-९३ च्या काळातील भारत आणि आजचा भारत यात जमीन अस्मानाचा फरक आहे. तेव्हा साम्प्रदायिकतेची कथा अजून बांधली जात होती; आज मात्र राज्यसत्ता, माध्यमे, भांडवल आणि तंत्रज्ञानाच्या आधारावर तिचा पायाभूत दबदबा निर्माण झाला आहे. त्यांनी बाबरी विध्वंस, गुजरात २००२, दहशतवादाच्या कथानकांची निर्मिती आणि इलेक्ट्रॉनिक निवडणूक प्रक्रियेवरील विश्वासघात यांचा उल्लेख करत सांगितले की, असहमती व्यक्त करणाऱ्यांसाठी आजची परिस्थिती अधिक कठीण आहे.

पटवर्धन यांचा जोर होता की, लढा हा कोणत्याही धर्माचा नसून विचारशक्ती व मानवी मूल्यांचे रक्षण करणाऱ्यांचा आहे. आपण सर्वप्रथम मानव आहोत. युद्ध, लोभ आणि हवामान संकटाच्या काळात आपल्याला एकमेकांचे रक्षण करणे हीच खरी कुटुंबभावना आहे.

आपले भाषण संपवताना त्यांनी इरफान इंजिनिअर, डॉ. राम पुनियानी आणि सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले. असगर अली इंजिनिअर यांचे काम टिकून आहे, कारण त्यांच्या मागे आजही एक मजबूत, निष्ठावंत टीम उभी आहे, असे ते म्हणाले.

# डॉ.अ.अ. इंजिनिअर 'उत्कृष्ट संशोधन पेपर पुरस्कार' डॉ. काझी सारा यांना



**मुंबई । रयत समाचार**

डॉ. असगर अली इंजिनिअर उत्कृष्ट प्रकाशित संशोधन पेपर पुरस्कार डॉ. काझी सारा रशीद यांना घोषित करण्यात आला आहे. एडिनबरो (स्कॉटलंड) येथील युनिव्हर्सिटी ऑफ एडिनबरोच्या Institute for Advanced Studies in the Humanities मधील त्या GENDER.ED Postdoctoral Fellow म्हणून कार्यरत आहेत.

त्यांच्या Transcending Binaries through Self-empowerment and Personal Development: Exploring the Role of Muslim Women Activists in Community Reforms या संशोधन लेखाला South Asia Multidisciplinary Academic Journal (SAMAJ) (ISSN: 1960-6060)b मध्ये ३० जून २०२३ रोजी प्रकाशित झाल्यानंतर शैक्षणिक क्षेत्रात विशेष दाद मिळाली. प्रतिष्ठित परीक्षक मंडळाने विविध संशोधन लेखांचे परीक्षण करून हा सर्वोच्च सन्मान त्यांना प्रदान केला. या पुरस्कारामध्ये ₹२५,०००/- इतकी रोख रक्कम आणि प्रमाणपत्राचा समावेश आहे. हा पुरस्कार प्रख्यात इस्लाम अभ्यासक, विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. असगर अली इंजिनिअर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्थापन करण्यात आला आहे. ते Centre for Study of Society and Secularism चे संस्थापक अध्यक्ष होते.

# गणितविज्ञान प्रदर्शनात शनिशिंगणापूर शाळेचा 'बहुउद्देशी बंब' प्रथम

**नेवासा । विजय खंडागळे**

श्री शनेश्वर देवस्थान ट्रस्ट संचलित श्री शनेश्वर माध्यमिक विद्यालय, शनिशिंगणापूर येथील प्रयोगशाळा परिचर सुनील गायकवाड यांनी सादर केलेल्या 'बहुउद्देशी बंब' या उपकरणाला नेवासा तालुकास्तरीय गणितविज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक मिळाला असून त्यांच्या उपकरणाची जिल्हास्तरीय प्रदर्शनासाठी निवड झाली. नेवासा तालुक्यातील २२० हून अधिक शाळांमधील जिल्हा परिषद, हायस्कूल, जुनिअर कॉलेजमधील विद्यार्थी, शिक्षक, प्रयोगशाळा परिचर व सहाय्यक यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला होता. या तीव्र स्पर्धेत गायकवाड यांनी सादर केलेल्या उपकरणाने उल्लेखनीय कामगिरी केली. या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक दिलीप लोंडे, विज्ञान शिक्षक भगवान दरंदले, किशोर दरंदले, राजेंद्र गहिले यांनी गायकवाड यांना विशेष मार्गदर्शन केले. प्राप्त यशाबद्दल विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच देवस्थानचे मुख्य कार्यकारी अतुल चोरमारे, व्यवस्थापक शितलकुमार सावळे, तसेच शनेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष भागवत बानकर आणि सर्व विश्वस्त यांनीही गायकवाड यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# गणितविज्ञान प्रदर्शनात श्रीगोंदा माध्यमिक विद्यालय, ज्ञानदीप विद्यालयाचे यश





**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा तालुका गणित विज्ञान अध्यापक संघटना व पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३वे तालुकास्तरीय विज्ञानगणित प्रदर्शन न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगाव येथे उत्साहात पार पडले. या प्रदर्शनात श्रीगोंदा माध्यमिक विद्यालय व ज्ञानदीप विद्यालयाची विद्यार्थिनी कु. ईश्वरी राजेंद्र गारुडकर हिने सहावी ते आठवी लहान गटातील गणित विभागात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले असून तिची जिल्हा स्तरासाठी निवड झाली.कु. ईश्वरीच्या या यशाबद्दल नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन व ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे सचिव आदरणीय राजेंद्र नागवडे, संस्थेच्या अध्यक्षा अनुराधा नागवडे, संस्थेचे निरीक्षक बी. के. लगड, छत्रपती शिक्षण संस्थेचे निरीक्षक सचिन लगड, विद्यालयाचे मुख्याध्यापक आनंदकर, गांजुरे, मार्गदर्शक शिक्षक गारुडकर तसेच सर्व सेवकवृंद, तालुका गणितविज्ञान संघटनेचे पदाधिकारी, ग्रामस्थ व पालकांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# उत्तर महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाध्यक्षपदी डॉ. भागवत; २७, २८ डिसेंबरला संमेलन

**जळगाव । रयत समाचार**

जिल्ह्यातील पाल (यावल) येथे २७, २८ डिसेंबर २०२५ रोजी संपन्न होत असलेल्या ५ व्या उत्तर महाराष्ट्र पक्षिमित्र संमेलनाच्या अध्यक्षपदी धुळ्याचे ज्येष्ठ पक्षी अभ्यासक डॉ. विनोद भागवत यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. भागवत गेली १५-२० वर्षे पक्षी निरीक्षण पक्षी, सर्वेक्षण, पक्षी अभ्यास करत असून उत्तर महाराष्ट्र पक्षिमित्र संघटनेचे क्रियाशीय संस्थापक सदस्य आहेत. या संमेलना दरम्यान जळगावचे राहूल सोनवणे यांना डॉ. सुधाकर कुऱ्हाडे पुरस्कृत युवा पक्षी संशोधक पुरस्कार अमळनेरचे अश्विन लिलाचंद पाटील यांना डॉ. अनिल माळी पुरस्कृत पक्षी जनजागृती पुरस्कार तर जळगांवच्याच डॉ. चंचल समीर शाह यांना न्यू कॉन्सरवर पुरस्कृत महिला पक्षी अभ्यासक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या तीनही पुरस्कारांचे स्वरूप रोख रु. १,५५१/- आणि सन्मानपत्र असे आहे.



संमेलनाचे आयोजन महाराष्ट्र वन्यजीव विभाग (नाशिक) आणि चातक निसर्ग संवर्धन संस्था वरणगांव (जि. जळगाव) यांनी केले असून संपूर्ण महाराष्ट्रातून सुमारे शंभर प्रतिनिधी या संमेलनासाठी उपस्थित राहतील, अशी अपेक्षा आहे.

संमेलनाचे उद्घाटन जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते होणार असून पाणथळ अधिवास आणि पाणयळीतील पक्षी विविधता, संवर्धन या मध्यवर्ती विषयावर तज्ज्ञांची व्याख्याने, स्लाईड शो होणार आहे. संमेलनात सहभागी होणाऱ्यांसाठी जंगल सफारी, कँप फायर, आदीवासी लोकनृत्य, खानदेशी स्वादीष्ट भोजन आदी गोष्टींची मेजवानी मिळणार असल्याचे चातक संस्थेचे अनिल महाजन, उदय चौधरी यांनी सांगितले.

# मोडी लिपी निबंध स्पर्धा

**मुंबई । रवींद्र मालुसरे**

श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने शिवोत्सव २०२६ निमित्त मोडी लिपी राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेसाठी पुढील विषय जाहीर करण्यात आले आहेत: शिवरायांचे दुर्गविज्ञान, आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज, शिवरायांची युद्धनीती, हिंदूधर्मरक्षक शिवराय, तसेच शिवरायांचे बालपण. निबंध मोडी लिपीत लिहून त्याचे देवनागरी लिप्यंतर संलग्न करणे आवश्यक आहे. स्पर्धेसाठी दिलेल्या फॉर्मवर https://forms.gle/mCj1XriJ1BsWHScR6निबंध अपलोड करणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी पंकज भोसले ९८२१००९१३७ किंवा अमित घाटये ९८३३६९१८५६ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे प्रमुख हेमंतराजे गायकवाड यांनी केले.

# शिवबावनी सादरीकरण स्पर्धेचे आयोजन

**मुंबई । रवींद्र मालुसरे**

कवी भूषण यांनी रचलेली ५२ छंदांची 'शिवबावनी' ही ब्रज भाषेतील वीर रसपूर्ण कविता छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि हिंदू धर्माच्या संरक्षणाचे तेजस्वी वर्णन करणारी काव्यरचना मानली जाते. शिवरायांचे व्यक्तिमत्त्व, त्यांच्या सैन्याचे पराक्रम आणि स्वराज्य स्थापनेचे महान कार्य यांचे प्रभावी चित्रण या काव्यात आढळते.श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने ''शिवबावनी सादरीकरण स्पर्धा'' ऑनलाइन पद्धतीने आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धे साठी प्रवेशिका व सादरीकरणाचा व्हिडिओ पाठविण्यासाठी https://forms.gle/UvJbCHppaNHtgrRR9 या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.विजेत्या स्पर्धकांना एका भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेसंबंधी अधिक माहितीसाठी पंकज भोसले ९८२१००९१३७ व सुलभा कोरडे ८०९७३२६६९९ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे प्रमुख हेमंतराजे गायकवाड यांनी केले आहे.

# मेळावा यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू- आगळे

## स्वागताध्यक्षपदी आगळे; मुख्य निमंत्रकपदी पोपळघट, हारेर, हराळे

**अहमदनगर । रयत समाचार**

अखिल लोहार समाज विकास संघ, लोहार यूथ फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील लोहार समाज बांधवांच्या संयुक्त विद्यमाने शहरात आयोजित करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय लोहार समाज वधू-वर परिचय मेळाव्याची धडक तयारी सुरू झाली आहे. या मेळाव्याच्या स्वागताध्यक्षपदी प्रा. हर्षल आगळे यांची निवड करण्यात आली असून प्रमुख निमंत्रक म्हणून समाजातील ज्येष्ठ नेते दशरथ पोपळघट, खोसपुरीचे माजी सरपंच सोमनाथ हारेर, तसेच पत्रकार नवनाथ हराळे यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. या निवडीची अधिकृत घोषणा अखिल लोहार समाज विकास संघाचे पदाधिकारी संदीप थोरात यांनी केली.

यावेळी नूतन स्वागताध्यक्ष हर्षल आगळे म्हणाले, शहरात प्रथमच राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात येत आहे. माझ्यावर स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी सोपवून समाजाने दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे. आज मुला-मुलींची लग्नं जुळवणे हे अनेक पालकांसाठी आव्हान ठरत आहे. समाजातील तरुण-तरुणींना योग्य जीवनसाथी मिळावा, यासाठी हा मेळावा महत्त्वाची भूमिका बजावेल. सर्वांच्या सहकार्याने हा मेळावा इतिहासात नोंद व्हावा, यासाठी मी पूर्ण परिश्रम घेणार आहे.

११ जानेवारी २०२६ रोजी शहरातील लक्ष्मी नारायण मंगल कार्यालयात हा भव्य वधू-वर परिचय मेळावा पार पडणार आहे. मेळाव्याच्या नियोजन सभेचे आयोजन शहरात बुधवारी करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष कौसे होते. व्यासपीठावर प्रभाकर लाड, संदीप थोरात, विश्वनाथ लोखंडे, आप्पा लोहार, डॉ. मुकुंद लोखंडे यांसह विविध मान्यवर उपस्थित होते.



बैठकीत मेळावा यशस्वी व्हावा यासाठी नियोजन, विविध समित्यांची आखणी, जबाबदाऱ्या, कार्यक्रमाची रूपरेखा यावर सविस्तर चर्चा झाली. समाजातील कारागीर, तरुण विद्यार्थी आणि पालकांसाठी उपयुक्त ठरेल असे विशेष व्याख्यान मेळाव्यात आयोजित करण्यात येणार आहे. तसेच समाजहितासाठी कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान, तसेच वधू-वर परिचय पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात येणार आहे.


या बैठकीस बाळासाहेब इघे, अमोल जवणे, सुधाकर कौसे, रोहिणी हराळे, पत्रकार अनिल हिवाळे, दादासाहेब आगळे, गणेश भालके, एकनाथ कौसे, अशोक पवार, अशोक हराळे, डॉ. मच्छिंद्र गाडेकर, भास्कर थोरात, निवृत्ती पोपळघट, विजय म्हस्के, सागर आगळे, हितेश कावरे, मनोज लोखंडे, विजय जगताप, पितांबर जवणे, श्रीहरी आगळे, ऋषिकेश कौसे यांसह मोठ्या संख्येने लोहार समाज बांधव उपस्थित होते.

प्रास्ताविक नवनाथ हराळे यांनी करताना मेळाव्याची रूपरेषा सादर केली. तर संदीप थोरात यांनी हा मेळावा अहिल्यानगर जिल्ह्याला अभिमान वाटेल असा आणि लोहार समाजात आजवर न झालेल्या भव्य स्वरूपात करण्याचा संकल्प व्यक्त केला. आभार प्रदर्शन अखिल लोहार समाज विकास संघाचे सहसचिव बाळासाहेब इघे यांनी केले.

# लोकायुक्त कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अण्णा हजारे पुन्हा रणांगणात; ३० जानेवारीपासून उपोषण

**पारनेर । रयत समाचार**

नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात लोकायुक्त सुधारणा विधेयक मंजूर झाल्यानंतरही त्याची अंमलबजावणी होत नसल्याने ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी पुन्हा एकदा कठोर पवित्रा घेतला आहे. लोकायुक्त कायद्याची दोन वर्षांपासून अंमलबजावणी न झाल्यामुळे ते ३० जानेवारी २०२६ पासून राळेगण सिद्धी येथील यादव बाबा मंदिरात आमरण उपोषणास बसणार असल्याची माहिती त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे दिली आहे. महाराष्ट्र सरकारने २८ डिसेंबर २०२२ रोजी विधानसभेत आणि १५ डिसेंबर २०२३ रोजी विधानपरिषदेत लोकायुक्त विधेयक मंजूर केले. परंतु, कायद्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे ''सरकारची इच्छाशक्ती दिसत नाही,'' अशी खंत अण्णांनी व्यक्त केली आहे. २०११ मधील लोकपाल-लोकायुक्त आंदोलनानंतर देशभरात निर्माण झालेल्या जनचळवळीची आठवण करून देत, भ्रष्टाचारमुक्त प्रशासनासाठी लढा सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



दरम्यान, नाशिकमधील कुंभमेळ्याच्या तयारीत होत असलेल्या तपोवन येथील वृक्षतोडीबाबतही अण्णांनी नाराजी व्यक्त केली. ''कुंभमेळा महत्त्वाचा असला तरी मोठी झाडे तोडू नयेत,'' अशी विनंती त्यांनी केली. लोकायुक्त सुधारणा विधेयकात करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार मुख्यमंत्रीही लोकायुक्तांच्या कक्षेत येणार असल्याचे फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले होते. राष्ट्रपतींनीही विधेयकाला मान्यता देताना काही सुधारणा सुचवल्या होत्या. अण्णा हजारे यांच्या उपोषणाच्या घोषणेने राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा ढवळून निघण्याची शक्यता आहे.